रविवार, दि. १३ एप्रिल २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक २४९ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# शहराच्या लौकीकात भर घालणारा प्रकल्प - आ. खोतकर

## राज्यातील पहिला प्रकल्प - आयुक्त खांडेकर; मोती तलाव पुनरुज्जीवन व पुनर्विकास प्रकल्प

**जालना । प्रतिनिधी -** मोती तलाव पुनरुज्जीवन व पुनर्विकास प्रकल्प शहराच्या लौकीकत भर घालणारा प्रकल्प असल्याचे आ. अर्जुनराव खोतकर यांनी म्हटले आहे. प्रकल्पाच्या कामाची पाहणी शनिवार (दि १२) रोजी करण्यात आली. यावेळी आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. प्रसंगी जालना शहर महानगर पालिका आयुक्त संतोष खांडेकर, शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, आत्माराम बोराडे, विष्णु पाचफुले आदींची उपस्थिती होती.

आ खोतकर म्हणाले की, ज्या अपेक्षेने जनतेने विधानसभेत पाठविले त्याची जबाबदारी म्हणून विधानसभा मतदार संघात चांगल्या बाबी करण्याचा प्रयत्न आहे आणि राहील. मोती तलाव पुनरुज्जीवन व पुनर्विकास प्रकल्प केंद्र शासनाचा राज्यांना भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष सहाय्य योजनेतून होत आहे. यासाठी अकरा कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झालेला आहे. हे काम याच वर्षी (२०२५) पुर्ण होणार आहे. पुढील गणेश विसर्जन पर्यंत याचे काम पूर्ण झालेले असेल असा विश्वासही आ. खोतकर यांनी व्यक्त केला.

प्रकल्पाबद्दल सांगतांना आ. खोतकर यांनी रिटेनिंग वॉलची लांबी २०३ मी, पाण्याची साठवण क्षमता ३.५ कोटी लिटर, काँक्रीट रोडची लांबी २६६ मीटर असल्याचे सांगतांनाच विसर्जन कुंडाची साईज १०३ मी x ७५ मी x ६ मी, घाटाचे क्षेत्रफळ १०४ मी x ४६.५ मी, काळ्या पाषाण दगडाचे घाटाचे मटेरिअल, प्रवेशद्वार, तीन क्रेन, ओवरफ्लो पाईपलाईनची लांबी १२० मी असल्याचे सांगितले. या ठिकाणी संगीत कारंजा व गार्डनही होणार आहे.

मोती तलाव येथे हजारो गणेश मुर्तीचे तसेच देवीच्या मुर्तीचे विसर्जन करण्यात येते. तसेच उत्तर भारतीयांचा छटपुजासाठी हे येथे हजारो लोकं जमा होतात. मुर्ती विसर्जनामुळे प्लास्टर ऑफ पॅरीसच्या मुर्ती, त्यांना असलेल्या रासायनिक कलर यामुळे पाणी दुषित होत होते. कालांतराने तलाव पूर्ण भरून जाईल या घातक बाबी लक्षात घेऊन या ठिकाणी घाट बांधण्याचा शब्द आपण गणेशभक्त, देवी भक्तांना दिला होता. व त्यावर मनपा



आयुक्तांसह चर्चा करून मोती तलाव पुनरुज्जीवन व पुनर्विकास करण्याचे काम हाती घेतले. या कामाबद्दल कुणालाही कल्पना होऊ दिली नाही अन्यथा कुणी म्हटले असते हा प्रकल्प मी आणला असे म्हणत माजी आ. गोरंट्याल यांचे नाव न घेता त्यांच्यावर निशाणा साधला.

गौतम बौद्ध यांचा पुतळा बसविण्याचा शब्द आपण दिला असून तो ही लवकरच पूर्ण करण्यात येणार असल्याचेही यावेळी आ. खोतकर यांनी स्पष्ट केले.

प्रकल्प पाहणी दरम्यान शहर मनपा आयुक्त संतोष खांडेकर यांनी प्रकल्पांची इत्यंभूत माहिती पत्रकार व उपस्थितांना दिली त्याच बरोबर हा प्रकल्प राज्यातील पहिलाच प्रकल्प असल्याचेही त्यांनी सांगितले. संगीत कारंजे, गार्डन, घाट, विसर्जनाची व्यवस्था, प्रवेशद्वार याबद्दल त्यांनी स्थळ दाखवत माहिती दिली.



**जालना शहरातील नेहरु रोड सराफा बाजार परिसरातील एका ज्वेलर्सच्या दुकानासमोर एमएसईबी महावितरणच्या इलेक्ट्रिक विजेची डि.पी. उघडी आहे. त्यामुळे नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण झाला आहे. या ठिकाणी वाहनधारक वाहने उभी करतात. या मार्गावर वर्दळ अधिक असल्याने या ठिकाणी दुर्घटना घडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या गंभीर बाबीकडे महावितरणच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी वेळीच लक्ष देणे गरजेचे असून या ठिकाणी काही दुर्घटना घडल्यास यास महावितरणचे लाईनमॅनसह अधिकारी जबाबदारी स्विकारतील का? असा प्रश्न निर्माण झाला आहे.**

# पाणी टंचाईग्रस्त गावांना तात्काळ टँकर सुरू करा - भास्करराव अंबेकर

## शिवसेना शिष्टमंडळाने घेतली जि.प.सिईओची भेट

**जालना । प्रतिनिधी -** सध्या उन्हाळ्याचे दिवस असून दिवसेंदिवस उन्हाची तीव्रता वाढत आहे. जिल्ह्यातील छोट्या मोठ्या प्रकल्पांनी तळ गाठला आहे. त्यामुळे जिल्यातील अनेक गावांत पाणीटंचाई निर्माण होत आहे. अनेक तांडे, वस्त्या व गावांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण भटकंती करावी लागत आहे. याठिकाणी तात्काळ टँकर सुरू करावेत. जेणेकरून सामान्य नागरिकास त्याचा दिलासा मिळेल, असे शिवसेना जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर यांच्यासह शिष्टमंडळाने मुख्य कार्यकारी अधिकारी मिनियार यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.




शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या शिष्टमंडळाने शिवसेना पान २ वर

युवा आदर्श

### विश्वस्त ...

कशी सावरायची घडी
कसे कळणारं तटस्था
वादळे मनात आदळे
कसे समजावे त्रयस्था
कुटूंबभार पेला सहज
कर्तव्य प्रदान गृहस्था
थरथरू लागता आत्मा
सरळ जावे वानप्रस्था
विकोपाला वाद जाता
दोषी ठरवता मध्यस्था
बुडाखाली आग लागे
माहिती नसे अस्वस्था
उध्वस्त होणार मनोरा
रस्ता दावता बेशिस्ता
राक्षसी वृत्ती फोफावी
हतबल होतो फरिस्ता
कसा द्यायचा उपदेश
कान नसती आक्रस्ता
वाटा घाटी अटीतटीत
बदनामी रे सद्गृहस्था
उन्मळू पडली आस्था
लयास धर्मादाय संस्था
गिळंकृत करतो असूर
पातक माथी विश्वस्ता

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.







**श्री हनुमान जन्मोत्सव सोहळ्या निमित्त शनिवार (दि १२) रोजी जुना जालना भागातील वटवृक्ष हनुमान मंदीर येथील कार्यक्रमास आमदार अर्जुन खोतकर, मनपा आयुक्त संतोष खांडेकर यांच्यासह गणेश सुपारकर, विनायक महाराज फुलंब्रीकर, अरुण जामवाडीकर, अरुण भोसले, अजय गरड, मनोज शेटे, निरज मेवाडे, सुनील पाठक, महेश रत्नपारखी, ज्योती शेटे, संजय चंदन परिसरातील नागरिकांची उपस्थिती होती. प्रसंगी भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले होते.**

# स्त्रियांनी स्वत:चे अस्तित्व सांभाळावे- रजिया सुल्ताना

**जालना । प्रतिनिधी -** स्त्री-पुरूषांनी एकमेकांना समजून घेणे आवश्यक असून पुरूषांनी स्त्रीची वैचारिक उंचीही लक्षात घ्यावी तसेच स्त्रियांनी आपले अस्तित्व सांभाळावे, असे आवाहन अमरावती येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या व लेखिका रजिया सुल्ताना यांनी येथे केले.

जालना शहरातील स्वामी विवेकानंद हायस्कूलच्या प्रांगणात सुरू असलेल्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमालेचे चौथे पुष्प गुफतांना त्या बोलत होत्या. डॉ. मीना बोर्डे ह्या अध्यक्षस्थानी होत्या. माजी आमदार कैलास गोरंट्याल, जालना जिल्हा परिषदेचे माजी सभापती सुदामराव सदाशिवे, सामाजिक नेते सुभाष गाडगे, सामाजिक कार्यकर्ते बबनराव रत्नपारखे आदींची यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती. प्रबोधन मंचावर व्याख्यानमालेचे अध्यक्ष ड. शिवाजी आदमाने, सहसचिव राजू मोरे आदींची उपस्थिती होती.

' स्त्री समजून घेतांना' या विषयावर विचार मांडतांना रजिया सुल्ताना पुढे म्हणाल्या की,भारताला स्वातंत्र्य मिळून आज ७५ वर्षे पूर्ण झालीत. परंतु आजही महिलांचे प्रश्न मात्र जागच्या जागीच आहेत. समाजाकडून महिलांची होत असणारी कुचंबना आणि तिच्याकडे बघण्याचा दृष्टिकोन ७५ वर्षात अजूनही बदललेला नाही. स्त्री घरात आणि बाहेर कुठेही सुरक्षित नाही. पूर्वीपासून विवाह जुळवण्यासाठी स्त्रीचा रंग, नाकडोळे, उंची, शिक्षण आदीं बाबींवर भर दिला जात आहे, मात्र तिची वैचारिक उंची कधीही गृहीत धरण्यात आली नाही, आज तिची वैचारिक उंची लक्षात घेऊन पुरुष मंडळींनी तिला समजून घेणे आवश्यक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान हे एक भारतीय महिलांसाठी एक प्रकारची देण आहे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी रमाबाई आंबेडकर तर महात्मा जोतिबा फुले यांनी सावित्रीबाई फुले यांना सन्मान दिला. तसा सन्मान आज स्त्री जातीला दिला जात नाही, तिच्यावर संशय घेतला जातो, तिला दुय्यम दर्जाची वागणूक दिली जाते. कौटुंबिक हिंसाचार, घटस्फोट, अत्याचार आदी बाबी समाजात घडत आहेत, याला कारण म्हणजे स्त्री-



पुरूषांनी कधीही एकमेकांना समजून घेतले नाही, सामाजिक पातळीवरही स्त्रीला समजून घेतले जात नाही,स्त्रियांविषयी असलेली वैचारिक अंधश्रद्धा जोपर्यंत संपत नाही, तोपर्यंत स्त्रीला महत्त्वाचे स्थान मिळणार नाही, जगासमोर दोन सत्य समोर आली आहेत, स्त्री ही प्रतिकुल परिस्थितीला सामोरे जाते, हे पहिले सत्य आहे व तिची प्रगती कुणीही रोखू शकत नाही, हे दुसरे सत्य आहे. आज स्त्रीवादी दृष्टीकोन असलेली नवीन पिढी आपल्या हातात आहे, आपली मुले- नातवंडे यांच्या हातून स्त्रीवादी दृष्टीकोन असलेली पिढी घडवायला हवी. जात- धर्माच्या भिंतीतून बाहेर पडण्यासाठी तरूण पिढीला समजून घेणे पान २ वर

# केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्याहस्ते देवेंद्र भुजबळ सन्मानित

**मुंबई । प्रतिनिधी -** केंद्रीय समाजकल्याण राज्यमंत्री राम दास आठवले यांच्याहस्ते डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्रकारितेचे अभ्यासक म्हणून देवेंद्र भुजबळ यांचा नुकताच सन्मान करण्यात आला.

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त मुंबईतील रविंद्र नाट्य मंदिराच्या कला दालनात बॉर्डरलेस बाबासाहेब या डॉ राजेंद्र जाधव यांनी आयोजित केलेल्या प्रदर्शनाचे उद्घाटन श्री रामदास आठवले यांच्या हस्ते झाले.त्या वेळी हा सन्मान करण्यात आला.

**अल्प परिचय**

देवेंद्र भुजबळ यांनी आर्थिकदृष्ट्या आकर्षक असलेल्या बहुराष्ट्रीय कंपन्या सोडून विचारपूर्वक माध्यम क्षेत्र निवडले. पत्रकार, भारत सरकारच्या मुंबई दूरदर्शन केंद्रात निर्माता, महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयात जिल्हा माहिती अधिकारी , उपसंचालक, संचालक म्हणून आणि आता

न्यूज स्टोरी टुडे पोर्टल चे (www. newsstorytoday. com) संपादक असे गेली ४० वर्षे ते प्रसार माध्यमात सक्रिय आहेत.

दूरदर्शन मध्ये असताना, भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या शैक्षणिक पैलूवर आधारित माहितीपट , त्यावेळी राष्ट्रीय प्रसारणात हिंदी तून तर मुंबई दूरदर्शनवर मराठीतून प्रसारित झाला होता. या त्याकाळी खूप गाजलेल्या माहितीपटाची संकल्पना आणि निर्मिती सहभाग देवेंद्र भुजबळ



यांचा होता.

बाबासाहेबांच्या काळाराम मंदिर प्रवेशाच्या आंदोलनावर आधारित माहिती पटाच्या निर्मितीत ही त्यांचा सहभाग होता.

तर माहिती खात्यात असतांना मराठवाडा विद्यापीठाचे डॉ बाबासाहेब आंबेडकर असे नामांतर होण्यासाठी राज्यात अनुकूल वातावरण निर्माण व्हावे यासाठी महाराष्ट्र शासनाने दूरदर्शन वर राबविलेल्या मोहिमेचे समन्वय श्री भुजबळ यांनी केले होते.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रेरक पत्रकारिता हा त्यांचा संशोधन पर लेख महाराष्ट्र शासनाच्या लोकराज्य मासिकात तसेच अनेक मराठी वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध झाला आहे.या बरोबरच लोकराज्य मासिकाच्या हिंदी, इंग्रजी, गुजराती, ऊर्दू भाषेतील आवृत्याध्ये हा लेख प्रसिद्ध झाला आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी विविध व्यक्तींनी न्यूज स्टोरी टुडे पोर्टल वर लिहिलेले लेख,कविता यांचे संपादन करून तयार होत असलेले बाबासाहेब आणि आम्ही हे पुस्तक प्रकाशनाच्या वाटेवर आहे.

# घनकचरा व्यवस्थापना संदर्भात पथनाट्य सादर



**टेंभूर्णी । प्रतिनिधी -** डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ अंतर्गत समाजकार्य महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी, आज महात्मा फुले जयंतीनिमित्त सिडको बस स्टँड येथे घनकचरा व्यवस्थापन यावर पथनाट्य सादर केले. आजच्या फेरफटका यासदराखाली या पथनाट्याची निरीक्षण केले असता आज समाजाला घनकचरा व्यवस्थापनाची गरज आहे. सार्वजनिक ठिकाणी घनकचरा व्यवस्थापन करण्याची गरज आहे. सार्वजनिक ठिकाणी कचरा प्लास्टिक, प्लास्टिकच्या बाटल्या तसेच विविध अनावश्यक वस्तू रस्त्यावरच टाकून दिल्या जातात. त्यासाठी अनेक कायदे असताना सुद्धा या सगळ्या गोष्टींकडे पाळल्या जात नाही. यासाठी शिक्षण क्षेत्रातून सामाजिक कार्यकर्ते पुढे येतात ना दिसत आहे. समाजाला जागृत करण्याचं काम विद्यार्थी दशेतील विद्यार्थी घेत आहे. या विद्यार्थ्यांचे प्राध्यापक अनिल जाधव यांच्या नेतृत्वामध्ये, विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर केले या विद्यार्थ्यांमध्ये पथनाट्य सादर करताना, अंतरा सोनटक्के, निखिल वाटोळे, विठ्ठल सभा दिंडी, अमृता कचरे, ऋषिकेश पाखरे, अनिकेत गावडे, सीमा गिरी, नेहा गाडेकर, हर्षद सरकटे, प्रेरणा देशमुख, अश्विनी भुजाडे, विद्यार्थ्यांने भाग घेतला, घनकचऱ्याच्या विविध मुद्द्यांवर त्या मुद्द्यांवर भाष्य करताना घनकचऱ्याचे व्यवस्थापन कसे करता येईल यावर पथनाट्यातून भाष्य करण्यात आले. कचरा करू नये त्यापासून होणारे अपाय याही सांगण्यात आले. अनेक प्रवासी विद्यार्थ्यांचे कौतुक करतानाही दिसून आले.

# पलंग बावडीची महानगरपालिकेच्या दूर्लक्षामुळे दुरावस्था; टंचाईत पाणी असूनही मिळेना!

**जालना । प्रतिनिधी -** शहरात ८ ते १० दिवसांनी नागरीकांना पाणीपुरवठा होतो.पण काही भागात पाणीटंचाई तीव्र आहे. आज दिनांक १२ शनिवार रोजी दुपारी तीन वाजता मिळालेल्या माहितीनुसार शहरातील इंदिरानगर भागात पाणी असूनही पाण्याच्या नियोजनाचा फटका नागरीकांना बसत आहे.इंदिरानगर भागासह शहरात एकूण महत्वाच्या १५ बारव आहेत पण गेल्या १२ वर्षांपासून या बारवाची स्वच्छता महापालिकेनं केलेली नाही.त्यातील गाळ देखील काढला नाही.त्यामुळे या भागात बारव असलेल्या भागात प्रचंड पाणी उपलब्ध असूनही नागरीकांना पाणीटंचाईच्या समस्येला सामोरं जावं लागत आहे.इंदिरा नगर भागात पलंग बारवासारखा पुरातन बारव आहे.त्यात पाणीसाठा देखील चांगला आहे.पण महानगरपालिका या बारवांच्या देखरेखीकडे लक्ष द्यायला तयार नाही.त्यामूळे बारवात प्रचंड कचरा येऊन साचलाय. परिणामी नागरीक पाणी टंचाई असूनही यातून पाणी भरायला तयार नाही. शहरात अशा बारावांची संख्या १५ पेक्षा अधिक आहे. अनेक बारवांमध्ये पाणी देखील मुबलक आहे. पण इथे नियोजनाअभावी पाणीटंचाईला नागरीकांना सामोरं जावं लागतंय. इंदिरा नगर भागात असलेल्या बारवातून आजघडीला संपूर्ण इंदिरा नगर पाणी भरेल इतका पाणीसाठा उपलब्ध आहे मात्र त्याची स्वच्छता होत नसल्यानं कुणीही या बारवात पाणी भरण्यासाठी येत नाही. महापालिकेकडे या बारवाच्या स्वच्छतेची मागणी या भागातील नागरीकांनी केली वारंवार केली पण महापालिका लक्ष द्यायला तयार नाही.

# सिद्धार्थ महाविद्यालयात क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले यांची जयंती साजरी



**जाफराबाद । प्रतिनिधी -** येथील सिद्धार्थ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. श्याम सर्जे हे होते तर प्रोफेसर डॉ. सुनील मेढे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉक्टर श्याम सर्जे यांनी क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकताना एक सुशिक्षित महिला शंभर शिक्षकांची बरोबरी करते तात्कालीन सामाजिक परिस्थितीत स्त्रियांची पिळवणूक होत असायची त्यांना शिक्षणाचा अधिकार नव्हता त्याच काळात पाश्चिमात्य देशांमधल्या स्त्रिया शिक्षण घेऊन मतदानाच्या अधिकारासाठी झगडत होत्या तर भारतीय स्त्रिया शिक्षणापासून वंचितच होत्या. महात्मा ज्योतिबा फुले यांनी सावित्रीबाई फुले यांना शिक्षित करून इतर स्त्रियांसाठी शिक्षणाची द्वारे खुली केली महात्मा ज्योतिबा फुले यांनी सामाजिक तसेच शैक्षणिक व साहित्यिक क्षेत्रातही आपले योगदान दिले. असे मार्गदर्शन डॉ. श्याम सर्जे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रा.एस.एम. पाटील यांनी मानले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.




# जालन्याच्या रामनगर येथे जुन्या वादातून दोन गटात हाणामारी

## पोलिसांचं नागरिकांना शांततेचा आवाहन



**जालना । प्रतिनिधी -** तालुक्यातील रामनगर येथे जुन्या भांडणाच्या कारणातून दोन गटांत हाणामारी झाल्याची घटना काल रात्रीच्या सुमारास घडली. या हाणामारीत दोन्ही गटातील जवळपास सहा जण जखमी झाले आहेत. रामनगर येथे शेजुळ व जोशी या दोन गटांत नेहमी वाद होत असतो.

यापूर्वी सुद्धा दोन गटांमध्ये मारामारीची घटना घडलेली होती. त्यावरून पोलीस स्टेशन मौजपुरी येथे परस्पर विरुद्ध गुन्हे दाखल झालेले आहेत. काल रात्री शेजुळ व जोशी गटात पुन्हा वाद झाला. या वादाचे रूपांतर हाणामारीत झालं. या हाणामारीत दोन्ही गटातील सुमारे सहा जण जखमी झाले असून, त्यांच्यावर शहरातील वेगवेगळ्या रुग्णालयांमध्ये उपचार सुरू आहेत. दरम्यान, हाणामारीच्या घटनेनंतर मोठा पोलीस बंदोबस्त घटनास्थळी लावण्यात आला होता. सध्या परिसरात शांतता असून मौजपुरी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मिथुन घुगे यांनी नागरिकांना शांततेचा आवाहन केले आहे.

पान १ वरुन

## पाणी टंचाईग्रस्त ...

उपनेते लक्ष्मणराव वडले व जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर यांच्या नेतृत्वात नुकतीच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जगदीश मिनियार यांची भेट घेतली. जालना जिल्हा परिषदेत नव्यानेच रुजू झालेले मुख्यकार्यकारी अधिकारी जगदीश मिनीयार यांचे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने स्वागत करून शुभेच्छा देण्यात आल्या. तसेच जालना जिल्ह्यातील पाणी टंचाईसह इतरही समस्या मांडून जिल्ह्यातील एकूण परिस्थिती त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आली.यावेळी जिल्हा संघटक भानुदास घुगे, उपजिल्हाप्रमुख भगवानराव कदम,मुरलीधर शेजुळ, बाबुराव पवार, रमेश गव्हाड, मनीश श्रीवास्तव, मुरलीआबा थेटे, तालुका प्रमुख हरिहर शिंदे, शहरप्रमुख बाला परदेशी यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी शिष्टमंडळाच्या वतीने बोलताना जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर यांनी म्हटले की, अनेक गावांना जोडणारे ग्रामीण रस्ते मोठ्या प्रमाणावर खराब झालेले आहेत त्यांची तात्काळ दुरुस्ती करण्यात यावी. जिल्ह्यातील अनेक गावातील आरोग्य केंद्रांना कर्मचारी वर्ग व औषधांचा साठा पुरेशा प्रमाणात नाही. त्यामुळे रुग्णांची हेळसांड होऊन आर्थिक भुर्दंड सहन करावा लागतो. जिल्ह्यात रोजगार हमी योजनेअंतर्गत झालेल्या अनेक कामांसाठी निधी उपलब्ध करून देण्यात आलेला नसल्याने अनेक कामगार व मजुरांची हेळसांड होते. तसेच ग्रामीण भागातील अनेक शाळांच्या इमारती मोडकळीस आलेले आहेत.

त्यांची तात्काळ दुरुस्ती करावी. तर अनेक शाळांना नवीन वर्ग खोल्या व इमारतीची गरज आहे. त्यांना त्या बांधून देण्यात याव्यात पुरेशा प्रमाणात शिक्षक उपलब्ध करून देण्यात यावेत जेणेकरून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना विनाकारण शहराकडे धाव घ्यावी लागणार नाही.

अशा अनेक मागण्या शिष्टमंडळाच्या वतीने मुख्यकार्यकारी अधिकारी मिनियार यांच्याकडे करण्यात आल्या. यासर्वच मागण्यांना मुख्यकार्यकारी अधिकारी मिनियार यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. यावेळी कुंडलिक मुठ्ठे, प्रभाकर उगले, अशोकराव हांडे, रामजी गायकवाड, शंकर जाधव, विठ्ठल पडूळ यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

## स्त्रियांनी स्वतःचे ...

आवश्यक आहे.

आजची स्त्री ही हिंमतीने पुढे येत आहे, हिंमत हिच तिची ताकद असून स्त्रियांनी लेफ्ट राईट करीत संसार न करता एकमेकांना समजून घेत संसार करायला हवा, अनेक स्त्रिया ह्या आपल्या चेहऱ्यावरील सुरकुत्या कमी करण्यासाठी सौदर्य प्रसादने वापरतात, मात्र मनातील सुरकुत्या कमी होत नाहीत, महापुरुषांच्या ज्ञानसंपदेच्या माध्यमातूनच ह्या मनातील सुरकुत्या कमी होतील, असा दावा रजिया सुल्ताना यांनी यावेळी केला. वाचन- लेखन चळवळ गतिमान करावी,पुस्तक वाचताना माणूस आतून वाचावा, असे आवाहन करून समाजाने स्त्रीला समजून घेतले तरच तिच्या हातून कुटुंब, समाज व देशाचा उध्दार होईल, असा आशावादही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

प्रमुख पाहुणे म्हणून बोलतांना कैलास गोरंट्याल म्हणाले की, ४८ वर्षापासून जालना शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमालेच्या माध्यमातून महापुरुषांचे परिवर्तनवादी विचार तळागाळातील समाजापर्यंत पोहचवण्यात येत आहेत, जालना शहराला साहित्य - कलेचा वारसा आहे, विविध सामाजिक उपक्रमाच्या माध्यमातून हा वारसा टिकून राहिला असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रमुख पाहुणे म्हणून बोलतांना सुदामराव सदाशिवे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमालेच्या माध्यमातून महापुरुषांच्या विचाराचा जागर होत आहे, तरूण पिढीने वैचारिक उपक्रमात सहभागी होऊन महापुरुषांचे विचार आत्मसात करावे, असे आवाहन केले.

अध्यक्षीय समारोप करतांना डॉ. मीना बोर्डे म्हणाल्या की, भारतीय स्त्री ही गुलामगिरीत होती, तिला दुय्यम स्थान होते, महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तिला गुलामगिरीतून बाहेर काढून तिच्या उध्दारासाठी कार्य केले. यात सावित्रीबाई फुले यांचाही मोठा वाटा आहे, फुले- आंबेडकर झाले नसते आजची स्त्री ही विविध क्षेत्रात पुढे आलीच नसती. आजही स्त्रियांना प्रबोधनाची गरज आहे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमालेच्या माध्यमातून सामाजिक प्रबोधन होत आहे, हे प्रबोधन सातत्याने व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त करून डॉ. बोर्डे यांनी महात्मा फुले- सावित्रीबाई फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. या चौथ्या पुष्पाचे संचालन व आभार प्रदर्शन ज्योती काकडे यांनी केले.

यावेळी ड. बी. एम. साळवे, ड. ब्रम्हानंद चव्हाण, अण्णा सावंत,अशोक साबळे , डॉ. दादासाहेब गजहंस, साईनाथ चिन्नादोरे, प्रमोदकुमार रत्नपारखे, सुधाकर रत्नपारखे, सुनील साळवे, डॉ. शांताराम रायपुरे, डॉ. सुशील सूर्यवंशी, सतिश वाहुळे, संजय हेरकर, जीवन खंडागळे, प्रभाकर घेवंदे, भारती हेरकर, गयाबाई साळवे, छायाबाई हिवाळे, अनुराधा हेरकर, ड. राहुल आदमाने, ड. सिध्दार्थ चव्हाण, राजेभाऊ मगर यांच्यासह आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते , नागरिक- महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# सख्यांनो, आत्मविश्वासाने जगा - अलका भुजबळ

**मुंबई । प्रतिनिधी** - मनामध्ये आत्म विश्वास असेल तर तुमच्या जीवनात तुम्ही निश्चितच यशस्वी व्हाल, असा मूलमंत्र बहु आयामी अलका भुजबळ यांनी तमाम सख्यांना दिला. दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवरील हॅलो सखी या कार्यक्रमात डॉ. मृण्मयी भजक यांनी त्यांची नुकतीच 'बहुआयामी सखी ' म्हणून मुलाखत घेतली त्यावेळी त्या बोलत होत्या.

एका प्रश्नाचे उत्तर देताना अलका भुजबळ म्हणाल्या, एखादी घटना मनाविरुद्ध घडत असेल तर महिला, मुलींनी त्यावर विचार करून आपले विचार ठामपणे मांडले पाहिजे. आपल्या विचारानुसार ठाम भूमिका घेतली पाहिजे, तरच त्या त्यांच्या जीवनात यशस्वी होतील.

मी मुंबईत राहणारी असूनही माझ्या घरची मंडळी जुन्या विचारसरणीची असल्यामुळे मी दहावी पास झाल्या झाल्या माझे लग्न उरकण्याची त्यांना घाई झाली होती. परंतु मला आधी शिक्षण घ्यायचे होते, माझ्या पायावर उभे राहायचे होते आणि मनासारखा जोडीदार मिळाला तरच लग्न करायचे असा मी ठाम निर्णय घेतला होता. असे सांगून त्यांनी असाच ठामपणा प्रत्येक महिला आणि मुलीजवळ असला पाहिजे,असे प्रतिपादन केले.

इतर सख्यांना तुम्ही कसे पुढे आणले, रिटायरमेंट नंतर वेळ कसा घालवता ? या प्रश्नावर बोलताना अलका भुजबळ म्हणाल्या, प्रत्येकीकडे काही ना काही कला असते. त्यांच्या कलेला वाव मिळावा, संधी मिळावी म्हणून आम्ही आनंद मेळावा भरवित होतो.त्यात प्रत्येकजण आपली कला दाखवीत असते.

आरोग्य शिबीर भरवित होतो. समाज माध्यमांद्वारे आता तर अनेक दालने खुली झाली आहेत. महिलांसाठी शासनाच्या अनेक योजना आहेत. त्याचा कसा फायदा घ्यायचा हे आपण ठरवले




पाहिजे. उद्योग,व्यवसाय करताना आत्म विश्वास महत्वाचा असून तो आपण विकसित केला पाहिजे, असेही त्या म्हणाल्या.

मुळातच माझ्यात खिलाडू वृत्ती होती. त्यामुळे शाळेत खेळायला आवडतं असे. एमटीएनएलमध्ये व्हॉलीबॉल खेळत असे. सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घेत असे, पण हे सर्व नोकरी सांभाळून करीत असे. यासाठी सासूबाई, पती ,मुलगी यांचं नेहमीच प्रोत्साहन मिळत होते, असेही त्यांनी या मुलाखतीत सांगितले.

तुमचा अभिनयाचा प्रवास कसा होता? या प्रश्नावर बोलताना अलका भुजबळ म्हणाल्या, कला क्षेत्रातील अनुभव चांगला होता. सुहासिनी, सुहास जोशी यांच्या सारख्या मोठ्या कलाकारांबरोबर काम करायला मिळाले. दूरदर्शनवर प्रसारित झालेल्या दामिनी, बंदिनी, आई, बंदिनी, हे बंध रेशमाचे, महाश्वेता, जिज्ञासा आदी मालिकांमधून काम केल्याचे सांगून त्यांनी यासाठी देखील घरातून पूर्ण पाठिंबा होता, असे त्यांनी सांगितले.

कॅन्सर सारख्या आजारावर कशी मात केली ? यावर बोलताना त्या म्हणाल्या, पोटात एक गाठ होती. डॉक्टरांनी शस्त्रक्रिया करून ती काढली. ती गाठ कॅन्सरची होती.कॅन्सर झाला म्हटल्यावर ते मान्य करायलाच पाहिजे आणि ते मी मान्य केले. पुढे केमोसारखे उपचार घेतले. याच दरम्यान कॅन्सरबाबत लोकांमधे जाणीव जागृती व्हावी म्हणून एका लेखनिकाच्या साहाय्याने

'कॉमा ' नावाचे पुस्तक लिहिले. कॅन्सर म्हणजे फुल स्टॉप नाही, कॉमा करा आणि पुढे जायाचे असे सांगून त्या म्हणाल्या, कोणताही आजार झाला तरी आपला दृष्टीकोन सकारात्मक हवा. या आजारामध्ये पती देवेंद्र भुजबळ, मुलगी देवश्री यांनी खूप मनोबल वाढविले,असे त्यांनी सांगितले. या आजारातून बाहेर पडल्यानंतर 'आरोग्य संवादिनी ' हा कार्यक्रम सुरू केला. माझ्यावर दहा मिनिटांची डॉक्युमेंटरी तयार केली. मी कसे होते, यातून बाहेर कसे पडले आदी बाबींचा त्यात उल्लेख आहे. महिलांनी वेळच्या वेळी आपली तपासणी करून घेतली पाहिजे, आपले आरोग्य आपल्या हाती आहे, वेळेवर जेवण घ्यावे,नियमित व्यायाम, योगासने,ध्यान धारणा करावी सल्ला आपण या कार्यक्रमातून देत असतो, असेही त्या म्हणाल्या.

सध्या अलकाचे काय चालले आहे ? हे जाणून घेण्याच्या प्रयत्नात त्या म्हणाल्या, सध्या 'न्यूज स्टोरी टुडे ' हे पोर्टल आम्ही चालवतो. सुमारे ८५ देशात हे पोर्टल पोहचले असून पाच सहा लाखपेक्षा अधिक त्याचे व्ह्यूज आहेत असे सांगून राजकारण आणि गुन्हेगारी यासारखे विषय वगळून साहित्य, आरोग्य, समाज सेवा, यश कथा,पुस्तक परीक्षण, पर्यटन, सकस मनोरंजन , कविता व अन्य विषय आम्ही हाताळतो. शिवाय दररोज एक नियमित सदर असते. पोर्टल साठी देश विदेशातून लेख , कविता येत असतात, असे त्यांनी नमूद केले. शिवाय पुस्तक प्रकाशन व्यवसाय आम्ही सुरू केला असून बरीच पुस्तके प्रकाशित झाली तर काही प्रकाशनाच्या वाटेवर असल्याचे अलका भुजबळ यांनी सांगितले. संध्या पुजारी निर्मात्या असलेल्या या कार्यक्रमाला ठीक ठिकाणाहून उस्फुर्त प्रतिसाद मिळाला.

# रुद्रावतार हनुमान मंदिराच्या शेडचे लोकार्पण

**जालना । प्रतिनिधी** - जालना शहरातील गणेश जीन परिसरातील रुद्रावतार हनुमान मंदिराच्या प्रांगणात सौ. जमनाबाई शिवरतनजी बगडिया चॅरिटेबल ट्रस्टतर्फे उभारण्यात आलेल्या भव्य दिव्य शेडचे लोकार्पण शनिवार, दि. १२ एप्रिल रोजी हनुमान जयंतीच्या मुहूर्तावर आ. अर्जुनराव खोतकर यांच्याहस्ते संपन्न झाले आणि ट्रस्टचे चेअरमन पन्नालाल शिवरतन बगडिया यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. दरम्यान, माजी आमदार कैलास गोरंट्याल यांनीही या ठिकाणी भेट देऊन उपक्रमाला शुभेच्छा दिल्या.

प्रारंभी आ. खोतकर यांच्या हस्ते जन्मोत्सव आरती करण्यात येऊन त्यांच्याहस्ते शेडचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी आ. खोतकर म्हणाले की, पन्नालाल बगडिया यांनी उभारलेला हा शेड म्हणजे केवळ लोखंड, सिमेंट व पत्र्याचा ढाचा नाही, तर ही श्रद्धा, सेवा आणि समाजप्रेमाचे जिवंत रूप आहे. २३ मार्च रोजी माझ्याच हस्ते या शेडचे भूमिपूजन झाले होते. अवघ्या २० दिवसांत हे काम पूर्ण करणे हे त्यांच्या कार्यनिष्ठेचे उत्तम उदाहरण आहे. एकदा एखादे काम हाती घेतले की ते पूर्ण केल्याशिवाय थांबत नाहीत, हे या निमित्ताने पुन्हा सिद्ध झाले आहे, असे सांगून ट्रस्टच्या सेवाभावी कार्याचे विशेष कौतुक करत



भाविकांसाठी तयार करण्यात आलेल्या सुविधा भविष्यात उपयुक्त ठरतील, असा विश्वास व्यक्त केला.

यावेळी पन्नालाल बगडिया म्हणाले की, रुद्रावतार हनुमान मंदिर हे केवळ एक धार्मिक स्थळ नाही, तर हे भक्तांच्या एकतेचे प्रतीक आहे. मंदिरात येणाऱ्या भाविकांना अधिक सुविधा मिळाव्यात यासाठी हा शेड बांधण्यात आला. हनुमान जयंतीपर्यंत या शेडचे लोकार्पण करायचे, हा ध्यास घेऊन तातडीने काम पूर्ण करण्यात आले. यापुढेही समाजोपयोगी उपक्रम आम्ही राबवत राहू, असे ते म्हणाले.

यावेळी डॉ. राजेश सेठीया, विष्णू पाचफुले, सेवानिवृत्त उपविभागीय पोलीस अधिकारी अमोलसिंह गौर, पुरुषोत्तम मोतीवाला, गोवर्धन अग्रवाल, सुदेश करवा, अशोक अग्रवाल, राहुल अग्रवाल, रुपेश बगडिया, राजू बगडिया, आदित्य बगडिया, मनीष बगडिया, संतोष तिवारी, गिरीश मरलेचा, डॉ. कोमल रुणवाल आदींची उपस्थिती होती. दरम्यान, माजी आमदार कैलास गोरंट्याल यांनीही या ठिकाणी भेट देऊन उपक्रमाला शुभेच्छा दिल्या.

हनुमान जयंतीनिमित्त महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. सुमारे दीड हजारावर भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.



# ईद मिलन कार्यक्रमातून भारतीय संस्कृतीचे दर्शन - माजी आ. गोरंट्याल

**जालना । प्रतिनिधी -** शहरात होणाऱ्या ईद मिलन कार्यक्रमात सर्वधर्मीय व सर्व घटकातील नागरिकांचा समावेश असल्याने यातून भारतीय संस्कृतीचे दर्शन होते असे प्रतिपादन माजी आमदार कैलास गोरंट्याल यांनी येथे केले. ते इंडियन जर्नलिस्ट असोसिएशनने शुक्रवार (दि ११) रोजी आयोजित पत्रकार व पोलीस प्रशासन ईद मिलन कार्यक्रमात केले. यावेळी इंडियन जनर्लिस्ट असोचे मराठवाडा उपाध्यक्ष जावेद खान, प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्रचे जालना जिल्हाध्यक्ष दीपक शेळके यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे आ. गोरंट्याल म्हणाले की, गंगा जमुनाची विनम्रता ही जालन्यातून जनतेत आहे. या ठिकाणी होणाऱ्या विविध ईद मिलन कार्यक्रमात यांची अनुभूती येते. शहरात होणाऱ्या ईद मिलन कार्यक्रमात सर्व धर्माचे व सर्व घटकातील नागरिक सहभागी होतात. हे केवळ जालना शहरात होते. इतर ठिकाणी असे होत नाही. शेजारील औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) येथील विचार केल्यास तेथे सुख-दुखात केवळ एकाच कम्युनिटीचे नागरिक सहभागी होतांना दिसतात. जालना शहरातून भारतीय संस्कृतीचे दर्शन होते. याचा आपल्याला गर्व असल्याचेही माजी आ. गोरंट्याल म्हणाले. तसेच इंडियन जनर्लिस्टने आयोजित केलेला ईद मिलनचा कार्यक्रमाचे कौतूक करत यापुढे ही अशाच पद्धतीने कार्यक्रम व्हावेत अशी अपेक्षा व्यक्त केली.

प्रास्ताविकात आमेर खान यांनी सर्वधर्म समभाव हेच ध्येय ठेवून ईद निमित्ताने ईद मिलन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याचे सांगितले. या कार्यक्रमाच्या माध्यमातून पत्रकार आणि पोलीस यांच्यात समन्वय व्हावा, त्यांच्या एकमेकांशी भेटी-गाठी व्हाव्यात हा हेतू आहे. आजचा हा कार्यक्रम छोटेखानी असला तरी भविष्यात ईद मिलनच्या निमित्ताने जालना शहरातीलच नव्हे तर जिल्ह्याभरातील पत्रकार-पोलीस प्रशासन आणि प्रशासकीय पातळीवरील अधिकारी, डॉक्टर, वकील, व्यापारी, उद्योजक असे सर्वच घटकांतील नागरिकांचा समावेश करता येईल असा प्रशस्त कार्यक्रम घेण्याचा मानस यावेळी जिल्हाध्यक्ष आमेर खान यांनी व्यक्त केला.












ईद मिलन कार्यक्रमात शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, कदीम जालना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सिद्धार्थ माने, चंदनझिरा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सम्राटसिंग राजपूत, सदर बाजार पोलीस ठाण्याचे पोनि संदीप भारती यांच्यासह विविध पोलीस ठाण्याचे पोलीस कर्मचारी व वाहतुक शाखेचे पोलीस अधिकारी कर्मचारी यांच्यासह पत्रकार साहिल पाटील, शेख मुसा, दिलीप पोहनेरकर, अजय गाडे, अच्युत मोरे, संदीप भाकरे, शेख रुस्तम, नाजिम मनियार, बासित बेग, लेवी निर्मल, शेख शकील, अजिम पठाण, नरेंद्र जोगड, जे. के. पठाण, शेख झाकेर, समाधान, जावेद तांबोली आदी पत्रकारांसह आयोजक इंडियन जनर्लिस्ट असोसिएशनचे जालना जिल्हाध्यक्ष आमेर खान, महिला जिल्हाध्यक्ष निकिता काळे, वरिष्ठ उपाध्यक्ष शेख मुजीबोद्दीन, उपाध्यक्ष सुनील भारती, जिल्हा प्रवक्ते मजहर सौदागर, जिल्हा संरक्षक सुनील नरोडे, जिल्हा महासचिव शेख सलीम, संघटक तरंग कांबळे, चेतन पाटील, राहुल मुळे, शेख रईस, गणेश सातपुते आदींची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन ज्येष्ठ पत्रकार लियाकत अली खान यांनी केले. तर आभार सुनील भारती यांनी मानले.

# अहिंसेच्या माध्यमातून आध्यात्मिक शुद्धता आणि ज्ञानप्राप्तीचा मार्ग जैन धर्म शिकवतो - आ. बबनराव लोणीकर

## परतूर येथे जैन समाज बांधवांच्या वतीने आयोजित चातुर्मास कार्यक्रम

**परतूर । प्रतिनिधी -** जैन धर्म हा एक प्राचीन भारतीय धर्म आहे. अहिंसेच्या माध्यमातून आध्यात्मिक शुद्धता आणि ज्ञानप्राप्तीचा मार्ग शिकवतो. जैन तत्वज्ञानामध्ये, सर्व सजीवांना समान जीवन मानले जाते. अहिंसा, सत्य, अस्तेय, अपरिग्रह आणि ब्रह्मचर्य ही पाच प्रमुख तत्त्वे आहेत. हे तत्वज्ञान पुनर्जन्माच्या चक्रातून मुक्त होऊन मोक्ष प्राप्त करण्याचा मार्ग दर्शवते. योग्य विश्वास, योग्य ज्ञान आणि योग्य आचरण हा जैन धर्मियांच्या तत्त्वज्ञानाचा मूळ गाभा आहे. सर्व सजीवांना दु:ख न देणं आणि त्यांच्यावर अन्याय न करण, अर्थात अहिंसा हे जैन धर्मियांचे सर्वात महत्त्वाचे तत्व आहे. असे प्रतिपादन माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी आज केले.

गजानन मंगल कार्यालय, परतूर येथे जैन समाज बांधवांच्या वतीने आयोजित चातुर्मास कार्यक्रम प्रसंगी माजीमंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी आमदार बबनराव लोणीकर बोलत होते. प्रसंगी आमदार लोणीकर यांनी गच्छाधिपती श्रीमद विजय नित्यसेन सुरीश्वरजी महाराज, विद्वलरत्न जी महाराज, तारकरत्न जी महाराज, निर्भय रत्न जी महाराज यांचे आशीर्वाद घेतले. पुढे बोलताना आमदार लोणीकर म्हणाले की पुनर्जन्माच्या चक्रातून मुक्त होऊन मोक्ष प्राप्त करणे. मोक्ष म्हणजे सर्व दु:खातून मुक्त होणे आणि शांती प्राप्त करणे जैन धर्माचे तत्वज्ञान आहे. मोक्ष प्राप्त करण्यासाठी, जैन धर्माचे तत्त्वे आणि नैतिक सिद्धांत पाळणे आवश्यक आहे.



जैन धर्म हा हिंदूत्ववादी विचारसरणीशी संलग्न असलेला धर्म असून जगभरात शांतता नांदावी यासाठी सातत्याने प्रयत्नशील असणारा धर्म आहे. व्यापार आणि व्यवसायाच्या माध्यमातून स्वत:बरोबर समाजाला देखील प्रगल्भ बनवण्याचा प्रयत्न जैन समाज बांधवांकडून नेहमी केला जातो. देशभरात गोवंश हत्या बंदीचा कायदा लागू झाला त्यासाठी जैन धर्मियांनी मोठा पुढाकार घेतला होता हे दाब या ठिकाणी आवर्जून स्पष्ट करणे आवश्यक आहे असेही आमदार लोणीकर यांनी यावेळी सांगितले.

खोटं न बोलणे आणि नेहमी सत्य बोलणे. सत्य हे जीवन जगण्याचा मार्ग आहे असे जैन धर्मीय मानतात

चोरी किंवा गैर-वैधपणे काहीतरी घेणे या बाबी जैन धर्मियांमध्ये निशीद्ध मानल्या जातात. मालमत्तेची लालसा न करणे आणि अनावश्यक गोष्टी गोळा न करता अपरिग्रह हे मोक्षाकडे जाण्याचा मार्ग आहे. तसेच इंद्रियांवर नियंत्रण ठेवणे आणि वासनेवर विजय मिळवणे यासह ब्रह्मचर्य हे आत्म-नियंत्रणाचे प्रतीक मानवण्यात आले आहे. जैन धर्मावर विश्वास ठेवणे आणि त्याचे पालन करणे. योग्य विश्वास हे आत्म-प्रगतीचा मार्ग आहे. जैन तत्वज्ञानाचा अभ्यास करणे आणि सत्य काय आहे हे समजून घेणे. आत्म-ज्ञान प्राप्त करणे यासह जैन धर्माच्या तत्त्वानुसार जीवन जगणे. योग्य आचरण हे मोक्षाकडे जाण्याचा मार्ग आहे. असेही आमदार बबनराव लोणीकर यांनी यावेळी स्पष्ट केले.

यावेळी शत्रुघ्न कणसे, डॉ. सुखलाल कोटेचा, आनंद कोटेचा, भैरवलाल कोटेचा गणेशलाल कोटेचा विजय गौतम कोटेचा, नेमीचंद कोटेचा, सुमित भंडारी, स्वप्निल भंडारी, दिलीप नहार, कल्याण कोटेचा अभिनंदन सुराना महेंद्र कोटेचा नरेश कांबळे यांच्यासह परतूर शहरातील आणि विविध राज्यातून व देशाच्या कानाकोपऱ्यातून आलेले जैन समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जागृत दक्षिणमुखी घनतुप्त हनुमान मंदिर बारागाड्या कार्यक्रम उत्साहात



**जालना । प्रतिनिधी -** नवसाला पावणारा जालना शहरातील रामनगर येथील जागृत दक्षिणमुखी घनतुप्त हनुमान मंदिर बारागाड्या कार्यक्रम हनुमान जयंतीनिमित्त दि. १२ एप्रिल रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या बारागाड्या उत्सवासाठी अर्जुनराव खोतकर, भास्करराव अंबेकर, सुरेश रत्नपारखे, जगदीश भरतीया, राजेश राऊत, अशोक मेहत्रे, पंढरीनाथ सोळुंके, बाबुराव मामा सतकर, संजय राठोड, म्हसुजी वानखेडे, अशोक वाघमारे, चरणदास महंत, डॉ. विशाल धानुरे, ड. बी.एम. कुलकर्णी, बाबासाहेब वानखेडे , भगवान गाडेकर, रामेश्वर सुरसे, सिताराम रोडगे, अरूण वानखेडे, संदीप वानखेडे बाबासाहेब सोनवणे, हरिभाऊ वानखेडे, रामदास गोरे, वैजीनाथ नागरे, गणेश जाधव, संतोष गायकवाड, रमेश मुळे, साई टो पार्टस, ज्ञानेश्वर वानखेडे, शंकर वानखेडे, गोकुळ स्वामी, राजु सरोदे, शिवलाल घाडगे यांनी सहकार्य केले.

यावेळी घनतृप्त हनुमान बारागाड्या वउत्सव समितीच्या वतीने अहंकार देऊळगांव येथे भगवान येवले, गणेश सोमधाने व इतर गावातील लोक बारागाड्यासाठी सहकार्य करीत आहे.

# परतूर येथे श्री हनुमान जन्मोत्सवनिमित्त मंदिरात भाविकांची गर्दी

**परतूर । प्रतिनिधी -** परतूर रेल्वे स्टेशन परिसरातील हनुमान मंदीरात दरवर्षी प्रमाणे यंदाही हनुमान जन्मोत्सव जयंती उत्साहात साजरी करण्यात आली होती.नियमा प्रमाणे सकाळी सहाच्या दरम्यान जन्मोत्सव सोहळा पार पडला.या जन्मोत्सवाला हाजारोच्या संख्येने भाविक सहभागी झाले होते.मारोती जन्म,राजा दशरथाने पुत्रप्राप्तीसाठी पुत्रकामेष्ट यज्ञ केला तेंव्हा यज्ञातून अग्निदेव प्रगट होऊन त्यांने दशरथाच्या राण्यांसाठी पायस खीर यज्ञातील अवशिष्ट प्रसाद प्रदान केला. दशरथाच्या राण्यांप्रमाणेच तपश्चर्या करणाऱ्या अंजनीलाही पायस मिळाले होते. त्यामुळेच मारुतीचा जन्म झाला होता. म्हणून चैत्र पौर्णिमा दिवशी हनुमान जयंती साजरी करण्यात येते. हनुमान जयंती निमित्त दरवर्षी महाप्रसादाचेही आयोजन करण्यात येते या वर्षी मोठ्या प्रमाणावर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते व भाविकांनी हजारोच्या संख्येने महाप्रसादाचा लाभ घेतला.यावेळी हनुमान मंदिराचे पुजारी, संतोष अग्रवाल. राजू सुरसूरेवाले. अशोक केजरीवाल. बंडू दहीभाते. परवीन खैरे. रामजी डंक. योगेश खंडेलवाल. यांनी मेहनत घेतली.



# जिल्हा कारागृहात आरोग्य शिबीर संपन्न

**जालना । प्रतिनिधी -** जिल्हा कारागृह वर्ग-१ व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण आणि ओम मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल रिसर्च सेंटर प्रा. लि. यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा कारागृह वर्ग-१ येथे कैदयांसाठी आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले होते यावेळी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सचिव प्रणिता भारसाकळे-वाघ, जिल्हा कारागृहाचे अधिक्षक काळे, जिल्हा सरकारी वकील बी. व्ही. इंगळे, डॉ. रितेश अग्रवाल, डॉ. विपुल जैन, डॉ. विजय जाधव, धनसिंह सुर्यवंशी, विजय लिणार, कैलास पवार, ङ लक्ष्मण उढाण, ईश्वर बिल्होरे, कार्तिक मदन व विशाल वाघमारे यांची उपस्थिती होती.

यावेळी शिबीरात कारागृहात कैद्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली या ई. सी. जी. , बी. पी. शुगर तपासणी करण्यात आली. हाडांचे आजार व त्वचेचे आजार यांची तपासणी व त्या विषयी मार्गदर्शन करण्यात आले असल्याचे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.